# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

सकाळ
पुणे, गुरुवार
१३ जुलै २०१७
४

### 'हुतात्मा राजगुरू'च्या पाच तुकड्यांना मान्यता

राजगुरुनगर, ता. १२ : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्ष वाणिज्य शाखेसाठी चार आणि प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठीच्या एका अतिरिक्त तुकडीला राज्य सरकारकडून कायम विनाअनुदानित तत्त्वावर तुकडीस मान्यता मिळाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वाढलेले प्रमाण, त्यांचा वाणिज्य शाखेकडे असलेला कल आणि मर्यादित जागा यामुळे अनेक विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने आमदार सुरेश गोरे यांच्या माध्यमातून उच्चशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी, राज्य सरकारने विशेष बाब म्हणून या अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिली. यामुळे आता सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या प्रवेशाची चिंता मिटणार असल्याची भावना संस्था पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

६ पुढारी पुणे, मंगळवार ५ सप्टेंबर २०१७

### राजगुरू महाविद्यालयाच्या अतिरिक्त ५ तुकड्यांना मान्यता

राजगुरुनगर : प्रतिनिधी

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्ष वाणिज्य शाखेसाठी चार आणि प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठीच्या एक अशा एकूण पाच अतिरिक्त तुकड्यांना राज्य शासनाकडून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळाली आहे. याबाबत संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी माहिती दिली.

बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वाढलेले प्रमाण, त्यांचा वाणिज्य शाखेकडे असलेला ओढा आणि मर्यादित जागा यामुळे अनेक विद्यार्थी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने आमदार सुरेश गोरे यांच्या माध्यमातून उच्चशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी राज्य सरकारने विशेष बाब म्हणून या अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या प्रवेशाची चिंता मिटणार असल्याची भावना संस्था पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

प्रथम वर्ष वाणिज्य शाखेत प्रवेशासाठी महाविद्यालयात नावनोंदणी केलेले व प्रवेशापासून अद्याप वंचित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबरपर्यंत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्रवेश घ्यावा. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे (९८५०००८९२६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८



केसरी पुणे, ५ सप्टेंबर २०१७ ५

### राजगुरू महाविद्यालयाच्या ५ अतिरिक्त तुकड्यांना मान्यता

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्ष वाणिज्य शाखेसाठी चार आणि प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठीच्या एका अतिरिक्त तुकडीला नुकतीच राज्य शासनाकडून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता मिळाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी दिली. बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वाढलेले प्रमाण, त्यांचा वाणिज्य शाखेकडे असलेला ओढा आणि मर्यादित जागा यामुळे अनेक विद्यार्थी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने उच्चशिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी राज्य सरकारने विशेष बाब म्हणून या अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्वावर जलदगतीने मान्यता दिली आहे. यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या प्रवेशाची चिंता मिटणार असल्याची भावना संस्था पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी महाविद्यालयात नावनोंदणी केली आहे व जे विद्यार्थी प्रवेशापासून अद्याप वंचित आहेत, त्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी दि.१५ सप्टेंबरपर्यंत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील (०२१३५२२२०११), प्रबंधक कैलास पाचारणे (९८५०००८६२६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



संध्या रविवार, १० सप्टेंबर २०१७ ४

### राजगुरू महाविद्यालयाच्या ५ अतिरिक्त तुकड्यांना मान्यता

राजगुरुनगर : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्ष वाणिज्य शाखेसाठी चार आणि प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठीच्या एका अतिरिक्त तुकडीला नुकतीच राज्य शासनाकडून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता मिळाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष, अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी दिली.

बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वाढलेले प्रमाण, त्यांचा वाणिज्य शाखेकडे असलेला ओढा आणि मर्यादित जागा यामुळे अनेक विद्यार्थी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने उच्चशिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी राज्य सरकारने विशेष बाब म्हणून या अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्वावर जलदगतीने मान्यता दिली आहे. यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या प्रवेशाची चिंता मिटणार असल्याची भावना संस्था पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी महाविद्यालयात नावनोंदणी केली आहे व जे विद्यार्थी प्रवेशापासून अद्याप वंचित आहेत त्या सर्वांना पुढील १५ सप्टेंबर पर्यंत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील (०२१३५२२२०११), प्रबंधक कैलास पाचारणे (९८५०००८६२६). यांचेशी संपर्क साधावा.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख